## "ऊर्जा, जाणीव आणि विवेकज्ञान"

असतात. याचा अर्थ आपण जर अधिक ऊर्जावान असू तर जाणीवही अधिक व त्याचा परिणामस्वरूप अधिक विवेकज्ञान प्राप्त करू. जर आपल्याला विवेकज्ञान जास्त असेल तर जाणीवही जास्त व आपण ऊर्जावानही अधिक जास्त असू आपल्या सर्व अनुभवांचे सार ज्याला आपण विवेकज्ञान म्हणतो, युगायुगातील अनुभवाची बेरीज असते. विवेकज्ञान हे आपल्या सगळ्या पूर्वजन्मातील ज्ञान माहिती व अनुभव यांचे सार/रत्न/फूल आहे. निम्न 'स्व'च्या जीवन काळाला आवश्यक उद्देश ऊर्जा, जाणीव आणि विवेकज्ञान वाढविणे. याचाच अर्थ आध्यात्मिक वाढ/उत्क्रांती होय.

## "उघडलेले पुस्तक"

उघडलेले पुस्तक हे स्वाध्याय किंवा आध्यात्मिक पुस्तकांच्या अभ्यासा संदर्भात आहे. याचा अर्थ आध्यात्मिक पुस्तकांचा अभ्यास करणे आहे. लॉबसंग राम्पा, रिचर्ड बाख, जेन रॉबर्ट्स, कास्टनेडा, लिंडा गुडमन, एडगर साईस, स्वामी रामा, योगानंद परमहंस, इत्यादी सारख्या महान संताची पुस्तके लोकांना वाचायला लावणे हे पि.एस.एस.एम चे सर्वात महत्वाचे अंग आहे.

## "आपो दीपो भव"

आपल्या भौतिक अस्तित्वासाठी फक्त आपणच जबाबदार आहोत. फक्त आपणच आपल्याला मार्ग/प्रकाश दाखवू शकतो इतर लोक कदाचित मार्गदर्शन करतील. पण ते आपल्याला घडवू शकत नाहीत! प्रत्येक क्षणी आपणच आपले वास्तव निर्माण करतो हे आपण समजून घ्यायला हवे. आपल्या विशिष्ट इच्छांची, विशिष्ट वातावरणांची निवड करण्यांसाठी व त्यातील शुध्दता राखण्यासाठी स्वतंत्र रहायला शिकण्याइतके आपण विवेकी असायला हवे. फक्त दृढ इच्छाच वातावरणात त्यांच्या प्रतिकृति/प्रतिमा निर्माण करतात. आपण वरच्या आध्यात्मिक व सुयोग्य पातळीवर जाण्यासाठी हे सर्वाधिक योग्य आहे.


**पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटी, पुणे**

**संत ज्ञानेश्वर पिरामिड ध्यान केंद्र,**

सूर्य अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी सहकारनगर नं. २, पुणे ४११००९

**जोशी : ८२७५६९६६७८, हिमांगी : ९३७०५३८८६२, ओंकार : ९८२२६३३३६२, डॉ. बलानी : ९८२२०६५९०६, रितू : ९८९०६४४२०१, करे : ९०११६६८६२९, गानला : ९७६४७९८१९६, अंजली : ९०९६९३८१७१, तृप्ती : ९४२२५११९८१४, क्षत्रिय : ९७६२५५९६८०, रेखा : ९८२२५६६५३६, तेजल : ९८९०५३९५०९**



वाचा आणि सभासद व्हा! **ध्यान महाराष्ट्र** नवयुगाचे ई-मासिक मोबाईल नं. ८२७५६९६६७८




# पी. एस. एस.एम चे बोध चिन्ह

## पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटीज् मूव्हमेंट, इंडिया

पिरामिड ध्यान जगत – २०१६ अहिंसा शाकाहार जगत – २०२०

www.pssmovement.org

# पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटचे बोधचिन्ह

### त्यात खालील गोष्टी आहेत

त्रिकोण, किरणांसह अर्धा सूर्य, आभावलय व चक्रासह ध्यानी, ऊर्जा, जाणीव आणि विवेकज्ञान, उघडलेले पुस्तक, आपो दीपो भव

## "त्रिकोण"

**त्रिकोण उच्च 'स्व'** चे प्रतीक आहे.

खरे पाहता अध्यात्मविज्ञान विषयाचा संपुर्ण उद्देश आहे उच्च 'स्व' चे विवेकज्ञान व समज यांचा अर्क निम्न 'स्व' मध्ये जाणण्यासाठी आपण या पृथ्वीवर आलो आहोत हे समजणे.

कर्ता– करणारा, ज्ञाता– जाणणारा आणि विचारी–विचार करणारा असे तीन भाग मिळून त्रि–स्व म्हणजे उच्च 'स्व' बनलेला आहे. करणारा जो भाग आहे तो जिवात्मा निम्न 'स्व' म्हणून खाली येतो. उच्च 'स्व' ला चेतना शक्ती असेही म्हणतात. ध्यानामध्ये आपण नेहमी उच्च स्व ला, धडधडणारा – स्पंदन पावणारा त्रिकोण– तीन बाजू असलेला त्रिकोणी स्फटिक पहातो.

त्रिकोण पिरामिडच्या बाह्यांगाचे सुध्दा प्रतिनिधीत्व करतो. पिरामिडच्या विविध शक्ति आहेत. सूक्ष्मदेह भ्रमण (ॲस्ट्रल बॉडी ट्रव्हल) सोपा करणे पिरामिड ऊर्जेच्या मोठ्या परिणामांपैकी एक आहे.

## "किरणांसह अर्धा सूर्य"

**सूर्य** सुध्दा **'स्व'** चे प्रतीक आहे.

निम्न 'स्व' हा उच्च 'स्व' चा एक विशिष्ट किरण आहे. या पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीचा उच्च 'स्व'उच्च लोकात असतो म्हणजे आपला स्वतःचा 'स्व' त्याच्या विशीष्ट विस्तारातील सर्वकिरणांसह एकत्रित असतो. या भौतिक शरीरात असतांना आपल्या स्वतःच्या संपूर्णत्वाचे श्रय तितके, जास्तीत जास्त विवेकज्ञान पुन्हा मिळविणे हेच निम्न 'स्व'/ वैयक्तिक 'स्व'चे ध्येय असते.

**अर्धा सूर्य :** कारण या पृथ्वीवरील दृष्टीकोनातून आपण आपल्या महत्तम'स्व' चे संपूर्णत्व जाणून घेऊ शकत नाही. फार तर आपण त्याची बाहेरची रुपरेषा पाहू शकू. उरलेले सैध्दांतिक व अंतर्ज्ञानानेच समजून घ्यायला हवे.

## "आभावलय व चक्रासह ध्यानी"

पि.एस.एस.एम चे बोधचिन्ह ध्यानात बसलेला माणूस दाखवतो. ध्यान विज्ञानाचे महत्व वाढविणे–पसरवणे हे पिरामिड स्पिरिचुअल सोसायटी मूव्हमेंटचे (पि.एस.एस.एम) मुख्य ध्येय आहे. ध्यान करून मिळविलेले आत्मानुभव हाच आत्मज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग आहे.

ध्यानामध्ये आपण गुरुत्वाकर्षणाच्या विरुध्द असलेले शरीर बनतो आणि आपल्या भौतिक शरीरापासून आपला सुक्ष्मदेह (ॲस्ट्रल बॉडी) उच्च लोकात मुक्त संचार करण्यास मोकळा होतो. सूक्ष्मदेह भ्रमण (ॲस्ट्रल ट्रॅव्हल) हा महत्वाच्या ध्येयांपैकी एक आहे.

ध्यान म्हणजे आतील ज्ञानेंद्रियाना जागृत करणे. आतील ज्ञानेंद्रिये पूर्ण जागृत झाल्याचे तिसरा डोळा चिन्ह आहे. ध्यानात तिसरा डोळा कार्यरत होऊ लागतो. आणि त्याचा अंतिमपरिणाम(भूत व भविष्य) आकाशिक रेकॉर्ड नोंदी व दृष्टीआड असलेल्या वस्तु स्पष्टपणे पाहण्याची शक्ति मिळण्यात होतो.

जेव्हा 'तिसरा डोळा' जागृत होतो तेव्हा काय दिसते? तेव्हा खुप पुढचे दिसते. 'पर्यायी लहरी' असलेले विश्वलोक दिसतात. या जगात प्रकट होणाऱ्या सर्व परिणामांची मूळ कारणे पाहता येतात. 'तिसरा डोळा' प्राप्त करणे हे सर्व आत्म्यांचे मुख्य लक्ष असते.

आभावलय म्हणजे पदार्थाच्या सर्व वैयक्तिक ऊर्जांना झाकणारा कोष किंवा वलय.

चक्र म्हणजे ऊर्जा शरीरातील प्राणिक शक्तिंची प्रमुख बिंदू स्थाने.

आधुनिक काळातील लहान आकाराच्या पिरामिडमध्ये अनेक लोकांना आलेले अनुभव दर्शवितात कि स्वतःच्या ऊर्जा–जाणीव–विवेकज्ञान (Energy consciousness-wisdom) यात प्रगती करणे हाच पिरामिड रचनेमागील उद्देश आहे. पिरामिड ध्यानाच्या कल्पनेचे महत्व सांगणे हा पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंटच्या मुख्य उद्देशापैंकी एक उद्देश आहे. पिरामिडमध्ये केलेले ध्यान तिप्पट जास्त प्रभावी असते.

आपण सर्व ऊर्जा, जाणीव विवेकज्ञान याची परिमाणे आहोत. या संपूर्ण अस्तित्वात अशी कोणतीच गोष्ट नाही कि जी ऊर्जा–जाणीव–विवेकज्ञान नाही. सर्व जीवमात्रात फरक असतो. तो फक्त ऊ–जा–वि या तिन्हीच्या प्रभावात. ऊर्जा जाणीव व विवेकज्ञान प्रत्यक्ष रीतीने त्या त्या प्रमाणात